A New machinery and problems of women employment
Chayya Datar

# ' ३२ कोटीची नवी मशिनरी म्हणजे आम्हा बायकांचे मरण,' पण ... तुळसाबाई

सहा वाजता या ' असे आदल्या दिवशी मुक्ताबाईने सांगितले होते. मी सहाच्या ठोक्याला तुळसाबाईच्या दारासमोर उभी होते. दरवाजाला कुलूप. त्याची अर्थात थोडीशी कल्पना होतीच. ठरल्यावेळी घरी आली तर ती तुळसाबाई कसली ? गिरणी सुटली की आधी गिरणीच्या अंतर्गत कारभारी कमिटीची बैठक, रोजचे कामकाज, आढावा, निर्णय या बैठकीतील तुळसाबाईजी उपस्थिती गेल्या सात वर्षांत एक दिवस चुकली नाही. मग तुळसाबाईचे समाजकार्य. गिरणीतील ही पुढारीणबाई. गिरणीच्या बाहेर आली तरी लोकांच्या अडीअडचणी सोडविल्याशिवाय तिला चैन पडत नाही. कोणाला डॉक्टरकडे घेऊन जा. कोणाच्या घरी भांडण झाले असेल तर चार उपदेशाचे डोस पाज, अशी सर्वांची खुशाली विचारून ही बाई घरी येते. एकला जीव सदाशिव. आल्यावर उमेद वाटली तर चूल पेटवून स्वयंपाक नाहीतर लोकांकडच्या चहाच्या घुटक्यांनी हिच्या पोटाची खळगी भरते. दिवसभराच्या थकव्याने दमून गेलेली तुळसाबाई तशीच रिकाम्या पोटी झोपून जाते. लक्ष सगळे सकाळी होणाऱ्या साताच्या भोंग्याकडे. एकदा सात वाजता तुळसाबाई आत गेली की ती तुळसाबाई राहात नाही. वाईंडिंग मशिनचा भाग होते. मशिनबरोबर तिला नाचावे लागते. साडेतीनला पाळी संपली की पुन्हा तुळसाबाई माणूस होते. जिवंत हाडामांसाची. एवढाच तिचा मला परिचय. कार्यकर्त्यांच्या बैठकांना ती यायची. चुना मळत तीन तीन तास बसून रहायची. चर्चा लक्षपूर्वक ऐकायची. ती विधवा होती एवढीच तिच्या खाजगी जीवनाविषयी मला माहिती.

अर्धा-पाऊण तास वाट पाहिल्यावर तुळसाबाई आली आणि म्हणाली, 'अगदी विसरून गेले होतो ताई तुम्ही येणार ते. चला, आत चला.' तुळसाबाईचा पोशाख हा गिरणी कामगार बाईचा खास पोशाख असतो. गिरणी कामगार बाई नऊवारी पातळ नेसते पण ओचे वर घेऊन गुडघ्यापर्यंत. पाळी सुटून बाहेर आली की कमरेचा खोचलेला पदर सोडून खांद्यावर ओढला जातो, पण साडी गुडघ्यापर्यंत वरच सोयीची असते, लगबगीने चालायला. कोकणातील कुणबी, आगरी व कोळणी बाया गिरण्यांमध्ये कामें करतात. सातारा, कोल्हापुरच्या देशावरच्या बाया गिरणीमध्ये कामाला दिसणार नाहीत.

तुळसाबाईची आणि माझी बातचीत सुरू झाली आणि आज धिटाईने काम करणाऱ्या तुळसाबाईच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण मला कळत गेली. इतर बाया गेट मिटिंगला थांबत नाहीत. युनियनच्या मिटिंगला थांबत नाहीत. आणि तुळसाबाई रोज कमिटीच्या मिटींगला दोन दोन तास थांबत होती. हे कसे काय? पुरुषांच्या बरोबरीने कामकाजामध्ये भाग घेते. मला तिचे खूप कौतुक वाटत असे. तुळसाबाईने पहिल्यांदाच सांगितले, ' ताई, खरं सांगू का, मी बाई आहे असं मला वाटतच नाही. आता एवढं सर्वांबरोबर उठते बसते. पण कोणाही कार्यकर्त्याला विचारा, माझे बाईपण मी कधी मिरवलंय. की काही सवलती मागितल्या आहेत. खांद्याला खांदा लावून काय करते मी. पुष्कळदा मनात येते, बाकीच्या बाया काय म्हणत असतील ' दांडगी बाई आहे, पुरुषात बसते उठते ? पण मी मनातून विचार झटकून टाकते. असे नाही केलं तर कार्य कसे होणार. दोनदा ठरविले आपण कमिटीवर जायचं नाही. इतरांना संधी मिळू दे.

दोघींना पुढे आणले. म्हटलं, तुम्ही मिटिंगला हजर रहात जावा. बाकी कामाचे मी बघते. ' कसले काय ? कोणाच्या घरी लेक बाळंतपणाला आलीय. कोणाच्या घरी नवऱ्याचे डोके ठिकाणावर नाही. अशी काहीतरी कारणे निघायची आणि बायांना जमायचं नाही. तेव्हा म्हटलं आपणच पुढे व्हायला हवं. खरं सांगते, लग्न झालं आणि चालू वर्षात नवरा मेला तेव्हाच शपथ घेतली, या लग्नाच्या जाळ्यात फसायचं नाही. पाट लावायचा नाही. अनायसा मोकळं झालंय त तसंच राहू द्यायचं. म्हणून तर आज काम करू शकते मी चळवळीचे. '

तुळसाबाईच्या बाबतीत माझे कुतूहल चाळवले गेले. विधवा बाई म्हणजे घरची फुकटची मोलकरीण. सर्वांनी राबवून घ्यावं. त्याउलट तुळसाबाई विधवा-पणाला वर समजत होती. तिला नवराही अनाथ मिळाला होता. फारसे लागेबांधे नसलेला. त्यामुळे सासरच्या जंजाळातही ती सापडली नाही १९४२सालीच तुळसाबाईला स्त्री–मुक्तिची अस्पष्ट जाणीव झाली होती.

' तुळसाबाई, तू मूळची कुठली ? '

' तसे आमचे गाव कोकणात. मालवणच्या जवळ पण माझे वडील ' टाटा ' गिरणीत कामाला होते. आईही गिरणीत काम करी. मी लहान असताना वारले आईने दुसरे लग्न केले. सावत्र बाप घरात आला. दुसरा घरोबा केला की पहिल्या नवऱ्याची मुले सासरच्या माणसांनी घेऊन जावी अशी रीत. पण माझ्या काकाने मला नेलेच नाही. आईने मला वाऱ्यावर सोडले नाही. शाळेत घातले. शिक्षण फारसे झाले नाही. आईने लग्न करून दिले व शेजारच्याच खोलीत संसार मांडून दिला. मी ही अशी. पाट लावलेल्या आईची मुलगी. त्यामुळे नवराही असाच मिळाला. नातीगोती फारशी नसलेला. १० तोळे सोने, दोन्हीकडचा खर्च असे लग्न लागले. खरं म्हणजे आमच्यात साठ रुपये तरी नवऱ्याने मुलीला दिलेच पाहिजेत असा रिवाज आहे. मुलगी विकत घ्यायची प्रथाच म्हणा ना ! '

' नोकरीला सुरवात लग्नाच्या आधी की नंतर ?' लग्नाआधीच तीन वर्षे नोकरी करत होते मी. त्याची गंमतच झाली. लहानच होते. अक्कल नव्हती. रोज ११ वाजता सावत्र बापाला डबा पोचवायला गिरणीच्या दरवाजाजवळ जाऊन उभी रहायची. मैत्रिणीने विचारले, ' येणार का गिरणीत कामाला ?' ती एकदा ससूनमध्ये काम करायची. मी लगेच हो म्हटलं. तेव्हा बदली पास वगैरे भानगड नव्हती. बायांना लवकर काम काम मिळे. '

' लग्नानंतर नवऱ्याने काम सोडायचा आग्रह नाही धरला ?'

' कशाला धरेल ? '

' बायकोने काम केलेले तुमच्या जमातीमध्ये चालते का ?'

' खुशाल.. देशावरच्या बायकांसारख्या आम्ही पडद्यात नाही. मात्र एक असे. कामावरून परत आल्यावर तावडतोब घरात शिरायचं. गॅलरीत कोणाशी बोलायच नाही. तसा नवरा कडक होता. स्वतः जुगार खेळायचा, रेस बघायचा. मला हुकुमात ठेवायचा. तो गेल्यावर माझ्या सावत्र भावंडांची जबाबदारी मी उचलली. तीच आता माझा आधार आहेत. '

' किती साली कामाला सुरुवात केलीस तुळसाबाई ?

' आता आठवत नाही. पण मी कामाला लागले आणि गांधीबाबाचा संप झाला. तीन महिने चालू होता. तेव्हा पहिल्या प्रथम महागाईभत्ता सुरू झाला. रोजी दोन आणे वाढवून मिळाले. '

' संप कोणी केला, लालबावट्याने ?'

' नाही. मला आठवतंय्, काँग्रेसचे निशाण होते. गांधीबाबाने सांगितले म्हणून संप केला होता. सर्व गिरणगाव बंद होते. '

' तू पण भाग घेतला होतास ?'

' तर, आजपर्यंत एका पण संपात मी कामगारांच्या विरोधी नाय गेले. नेहेमी संपाच्या बाजूने उभी. त्यावेळी लहान होते. म्हणून पुढे नाही गेले. '

' त्यावेळी गिरणीमध्ये कामाची परिस्थिती कशी होती ?'

' दहा तास काम करत होतो आम्ही. एकच पाळी असायची सकाळी ७–३० ते ५–३० फक्त. आठ तास कामाचा दिवस त्यानंतर सुरू झाला. १८ वर्षांच्या खालच्या मुलांनासुद्धा कामाला ठेवीत. अर्धा पगार देत आमच्या खात्यांत १७० बाया होत्या. आता आम्ही

४० बाया आहोत. त्यावेळी प्रत्येक बाई १० बिडल वीत असे. म्हणजे १० कांडचांवर एकाचवेळी सूत जाई. त्यावर लक्ष ठेवीत असे. आज एक बाई १५ बिडल चालवते. नव्या मशिनवर ३२ बिडल बाई चालवते.'

'बाया कोणकोणत्या खात्यात कामे करतात ?'

वाइंडिग खात्यात मुख्यतः जेथे सूताच्या कांडचा भरल्या जातात. कपडा खात्यातील काम, जेथे कापड विणले जाते ते जरा कठीण असते. धोटा मध्येच अडतो, मोडतो. तेथे पुरुष असतात. घडी खात्यात बायांना ठेवावे असा अर्ज मी केला होता. पण त्याला अजून उत्तर नाही.'

'पगार किती ?'

'बायांना तेव्हा बेसिक पगार २० ते २५ रुपये असे. पुरुषांना ४० ते ४५ पडे.

'कामाचा प्रकार वेगळा ना ?'

'हो. हो. वायडिंग खात्यातील पुरुषांना तेवढाच पगार मिळतो आज. आज पहिल्या पाळीला बाया असतात, दुसऱ्या दोन पाळचांना पुरुष असतात.'

'खायची सूट्टी ?'

'दहा तास पाळीच्या वेळी एक तास असे आज अर्धा तास असते. तशा सोयी बऱ्याच होत्या. लायब्ररीची सोय होती. आज त्यांना लायब्रीची गरजच भासत नाही. कारण तरुण बायांना घेतच नाहीत कामावर.'

'लायब्री म्हणजे ?'

'मुलांना ठेवण्याची जागा. एकेक बाई तीन तीन मुलांना आणून ठेवत असे. त्यांना कंपनीकडून दूध मिळे. जेवण मिळे. बाळंतपणाचा खर्च बाकी मिळत नसे. दोन महिन्याची रजा खाडी समजली जाई. आजमात्र बाळंतपणाचा खर्च मिळतो. तीन महिने रजा मिळते. मात्र आज भरतीच होत नाही.'

'तुमच्याकडे कामवाट कधीपासून झाली ?'

'१९३८ साली मी कामाला लागले असावे. सुपारीबाग गिरणीतच पहिल्यापासून कामाला आहे मी. ७० साली आमची गिरणी सरकारी झाली. पण मशिनरी जुनीच आहे हो. आता ३२ कोटी रुपयांची नवी मशिनरी बसविणार आहेत. आम्हा बायकांचे मरण आहे. पण आमच्या कमिटीने ठरवलंय, कोणा बाईला कामावरुन काढू द्यायचे नाही.'

'चळवळीची गोडी कशी उत्पन्न झाली ?'

'ती ९ व्या वर्षापासून होती. आमच्या चाळीत एक काँग्रेसी कार्यकर्ता होता. तो मुलांना घेऊन प्रभातफेरी काढे. दारूच्या दुकानावर पिकेटिंग करायला नेई. पायऱ्यांवर झोपले होते मी. दोन दिवस तुरुंगात जाऊन आले. त्यानंतर १९[illegible] साली इंग्रज सरकारने डांग्यांना पकडले तेव्हा मोठा संप झालेला आठवतो. २० दिवस चालू होता. दरवाजे अडवायला मी पुढे होते. त्यानंतर संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत भाग घेतला होता. सत्याग्रहात तुरुंगात गेले होते. तुरुंगाची भीती कधीच वाटली नाही.'

'कधी अभ्यासमंडळाला गेला होता का ?'

'साठ सालीच मला वाटतं. पुण्याला एका शिबिराला गेले होते. ते चांगलं आठवतं. रोझा होती तेव्हा. शनिवारवाडचात तीन दिवस बसलो होतो. विषय होता घरगुती बायांचा. नवरा गेल्यावर मुले बाईला विचारत नाहीत. तेव्हा नावाने नवऱ्याने पैसे ठेवले पाहिजेत अशी मागणी होती. चांगली कल्पना होती. ५०० बाया जमल्या असतील. मिरजेच्या बाया बिडी काम करणाऱ्या, घरगुती बाया खूप जणी होत्या. त्यावेळी मी दळवी बिल्डिंगमध्ये जात असे. चळवळीचे ज्ञान घ्यावे असे वाटे. एका जनाबाई नावाच्या बाईचा प्रभाव खूप पडला होता माझ्यावर. तिने भाषण केले होते. चळवळीत भाग घेतला म्हणून तिला मालकाने बंद केले. दोन मुले होती तिला. तिला लाल बावटचाने आधार दिला. तेव्हापासून मलापण विश्वास वाटू लागला. १९५९ साली नाना पाटील, डांगे यांनी संप केला. १९६६ साली, १९६९ साली बोनससाठी संप झाला. १९७४ सालच्या ४२ दिवसांच्या संप लढचात मी होतेच. रोज सकाळी उठून गेटवर जायचे. माझा इतका धाक होता की एका माणसाची हिंमत होत नसे आत जाण्याची. माझ्या जोडीला इतर बायकांना स्फुरण चढायचे. घोषणा द्यायला मला फार आवडते. अगदी पुरुषासारख्या खड्या आवाजात घोषणा देते मी.'

'राष्ट्रीय मिल मजदूर संघाच्या लोकांनी तुम्हाला पुढारी म्हणून बोलावलं नाही का ?'

‘ तर खूप प्रयत्न केलं फिरवायचे. पैशाची आमिषे दाखवायचे. पण साधीसुधी बाई नव्हते मी. ’

‘ काय ग, जॉबर म्हणून अधिकाराच्या जागेवर बायांना निवडत नाही का ?’

‘ नाय ग बाई. त्यां जागेचे नाव आहे, ’ नायकीणं आणि तेच आम्हाला आवडत नाही. शिवाय त्या जागेवर गेले की अधिकाऱ्याची दासी बनून वागावे लागते. संधान बांधावे लागते. नायकिणीचीच जागा होते मग ती. ’

‘ काय ग, शेतीचे काम सोपे की मशिनीचे काम सोपं ?’

‘ मी शेतीचे काम फारसे केले नाही. आईबरोबर ५–७ वर्षातून एखादेवेळी गावी जाईन तेवढंच. पण मला वाटते मशिनीच्या कामाचा ताण फार. वेगात फिरते मशिन. धागा तुटला की ताबडतोब जोडून मशिन चालू ठेवावी लागते. नंतर, चलाखी, कौशल्य सर्वच पाहिजे. नाचून नाचून पाय मोडायला येतात. शिवाय वर्षभर सतत काम. आणि घरचा पसारा कमी नाही. शहरात रहाणीमान वाढलेले असते तसे कामही वाढते. ’

‘ बायकांना स्वतःच्या पायावर उभे राहिल्याचा आनंद मिळतो की नाही ?’

‘ मिळतो आणि नाहीसुद्धा. तुम्हाला सांगते ताई, ज्या घरी बाया नोकरी करतात नं त्यांपैकी निम्या घरी पुरुष बसून रहातात. व्यसनी बनतात. मुलांचे शिक्षणाकडे लक्ष नाही. सर्वजण तिच्यावर सर्व जबाबदारी सोपवून मोकळे. फार परवड होते अशा बायांमुळे त्यांच्या घरच्या माणसांना खुशालचेंडूपणाला उत्तेजन मिळते. ’

‘ तुळसाबाई आता हा शेवटचा प्रश्न. कमिटी काय प्रकार आहे ग ?’

‘ राष्ट्रीय मिल मजदूर संघ ही आमची प्रातिनिधीक कामगार संघटना. पण कुंपणच शेत खायला लागले तर कोणाकडे तक्रार करावी ? म्हणून आम्ही गिरणीतील कामगारांनी आपल्या पायावर उभे रहाण्याचे ठरविले आणि कमिटी केली. लोकांनी निवडलेल्या लोकांनीच कारभार बघायचा. व्यवस्थापकांशी करार करायचे असे ठरवून ताकद गोळा केली आणि संघाची नांगी ठेचली. आमचा सगळा व्यवहार लोकशाही पद्धतीने, अनेक विचारांच्या कामगारांच्या भागीदारीने चालतो. ही एका पक्षाशी बांधील नाही. मी तेथेच कार्य करते. ’

‘ मग तुला तुझ्या या कामाचा वेगळा पगार मिळतो का ग ?’

‘ नाही. उलट, पदरचेच पैसे पुष्कळदा खर्च होतात. आमचे काम अंगावरचे. सूत कमी भरले की पगार कमी मिळतो. मला फिरावं लागतं. बायांच्या अडचणी विचारायला. चार्जशीट, वॉर्निंगच्या चौकशीच्या वेळी हजर राहावं लागतं. माझे काय ? कोणासाठी कमावून ठेवायचे ? आपले शरीर समाजाच्या उपयोगी पडो हीच इच्छा. ’

— छाया दातार

---

## वढव येथील बहिष्कार

बुलढाणा जिल्ह्यातील मेहेकर तालुक्यात वढव हे एक गाव आहे. त्या गावातील बुद्ध लोकांनी गावातून लग्नाची मिरवणूक काढली म्हणून, गावकऱ्यांनी त्यांना विरोध केला. हा विरोध तर बुद्धांनी जुमानला नाहीच, तर उलट पुढे काही दिवसांनी गावातील सार्वजनिक विहीरीतून त्यांनी जाऊन पाणी भरले, म्हणून बुद्ध लोकांवर गावकऱ्यांनी बहिष्कार टाकला व त्यांची आर्थिक कोंडी करण्याचा प्रयत्न चालविला. बुद्ध शरण येत नाहीतसे पाहून, भोवतालच्या चार-पाच गावातील बुद्धांवरही बहिष्कार टाकण्यात आला आहे.

मार्च महिन्यात मतपेटीतून झालेली क्रांति कोणाच्या हिताची ठरणार आहे याची भ्रांत दलितांना पडली तर त्यांना दोष देता येईल का ? □